जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 JUL 2024
लोकमत

# डॉ. अजितकुमार डांगे यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राजेंद्रनगर येथील आणि



शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख, माजी कुलसचिव आणि माजी प्रभारी कुलगुरू डॉ. अजितकुमार डांगे (वय ६८) यांचे शनिवारी सायंकाळी पुणे येथे निधन झाले. गेले आठवडाभर ताप आल्याने त्यांना पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दाखल होते. मात्र उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

त्यांची विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून ओळख होती. शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रांत त्यांनी भरीव योगदान दिले होते. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख, विद्यापीठाचे कुलसचिव, बीसीयूडीचे संचालक, प्रभारी कुलगुरू म्हणून काम पाहिले होते. त्यासह अरुणाचल प्रदेश येथील अपेक्स प्रोफेशनल युनिव्हर्सिटी येथे कुलगुरू म्हणून सेवा बजाविली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 JUL 2024
सकाळ

# डॉ. अजितकुमार डांगे यांचे निधन



कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू व कुलसचिव डॉ. अजितकुमार आनंद डांगे (वय ६८, रा. राजेंद्रनगर) यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. गेले आठवडाभर ताप आल्याने त्यांच्यावर पुणे येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांचे शनिवारी (ता. २७) सायंकाळी निधन झाले. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख तसेच कुलसचिव, बीसीयूडी डायरेक्टर आणि प्रभारी कुलगुरू म्हणून काम पाहिले होते. त्यांनी अरुणाचल प्रदेशातील अपेक्स प्रोफेशनल विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून सेवा बजावली होती.